**महात्मा गांधी नरेगाच्या कामावरील हजेरीपट (e-muster) करण्यासाठी आपले सरकार केंद्राला प्रदान करण्याचे सेवा शुल्काचा दर निश्चित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)**
**शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१७/प्र.क्र.५२/मग्रारो-१**
नवीन प्रशासन भवन, १६ वा मजला
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २३ एप्रिल, २०१८

<u>वाचा</u> :-

१. म.गां.रा.ग्रा.रो. हमी कायदा, २००५
२. म.गां.रा.ग्रा.रो.ह. अधिनियम (सुधारित) कायदा, २००६
३. शासन पत्र क्र. मग्रारो-२०१७/प्र.क्र.५२/मग्रारो-१ दि. २५ जुलै, २०१७

<u>प्रस्तावना</u> :-

महाराष्ट्र राज्यात सन १९७७ (सन २००६ मध्ये बदल केल्यापासून) रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. या योजनेंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र ही योजना सुरू आहे. या योजनेच्या कामावरील हजेरीपट (e-muster) प्रचलित पद्धतीप्रमाणे न काढता त्यासाठी ग्रामपंचायतीला प्राधिकृत करणे व ग्रामपंचायत पातळीवरच ई-मस्टर निर्गमित करण्याची कार्यवाही करणे. त्यासाठी ग्रामपंचायतीला क्षमताबांधणी करणे व ई-मस्टर निर्गमित करण्याची कार्यवाही आपले सरकार पोर्टल मार्फत करण्याबाबत कार्यपद्धती नागपूर व अमरावती विभागातील एका जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर अवंलबिण्यात आली आहे. त्यामुळे ही कार्यपद्धती महाराष्ट्रात अवलंबिल्यास पंचायत समिती कार्यालयास डाटा एन्ट्री करिता मस्टर पोहचविण्यात लागणारा विलंब टाळता येईल व भविष्यात अधिक सोयी ई-मस्टर संगणकावर भरता येतील.

सद्यस्थितीमध्ये ग्रामपंचायत पातळीवर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या योजनेच्या कामाकरिता स्वतंत्रपणे संगणक सुविधा उपलब्ध नाही. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये संगणकीय कामकाजासाठी आपले सरकार केंद्र कार्यरत आहेत. याद्वारे ग्रामरोजगार सेवकांच्या मदतीने ग्रामपंचायत स्तरावरून ई-मस्टर निर्गमित करण्यात येत आहे. उपरोक्त कामासाठी सेवा शुल्काचा दर -एका निर्गमित केलेल्या मस्टरसाठी◦ निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनामध्ये मजूरांना अकुशल वेतन त्या कामाचे हजेरीपट बंद झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत देणे बंधनकारक आहे. विहित मुदतीमध्ये वेतन मजुरांना प्रदान करताना कार्यालयीन यंत्रणेला सुलभता व्हावी व त्याचप्रमाणे या योजनेच्या

कामामध्ये पारदर्शकता रहावी व प्रत्येक हजेरीपटाची नोंद MIS वर करून हजेरीपटाचे संनियंत्रण करता यावे यासाठी केंद्र शासनाच्या सूचनेवरून ही पद्धती अंमलात आली आहे.

राज्यात काही ग्रामपंचायती मध्ये ई-मस्टर च्या कामासाठी आपले सरकार केंद्राची मदत घेण्यात येत असून केंद्र चालक ग्रामरोजगार सेवकांच्या मदतीने ग्रामपंचायत स्तरावर ई-मस्टर निर्गमित करण्याचे काम करित आहे. आपले सरकार केंद्राच्या केंद्र चालकाला खालीलप्रमाणे अटी व शर्तींच्या अधीन राहून सेवाशुल्काचा दर हा एका निर्गमित केलेल्या ई-मस्टरसाठी ५ रूपये (पाच रूपये) प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

**ई-मस्टर निर्गमित करण्यासाठी केंद्र चालक यांची जबाबदारी**

१) सदर कामावर हजर राहणा-या अपेक्षित मजूरांची यादी प्राप्त झाल्यानंतर www.nrega.nic.in या अधिकृत संकेतस्थळावरुन GP Login मध्ये जावून demand upload करणे.(D.३ Works Demand-demand for work entry)

२) www.nrega.nic.in या अधिकृत संकेतस्थळावरुन GP Login मध्ये जावून नविन कामाकरीता Work Code Generate करणे. (D.४ Works)

३) Demand upload झाल्यानंतर याच संकेतस्थळावरुन यादीतील मजुरांना Work allocation ची प्रक्रिया पूर्ण करणे (D.५ Works Allocation- work allocation entry) व तालुका स्तरावरील ई- मस्टरशी संबंधीत ऑपरेटर ला दुरध्वनीवरुन या बाबीची सुचना देणे.

४) तालुका स्तरावरील ऑपरेटर PO Login मधुन या Demand ला Approve/issue (D.७.१-Generate E-muster Roll) केल्यानंतर सदर ई-मस्टरची प्रिंट GP Login मधून काढणे. (D.७.२-E-Muster Roll-print E-Muster Roll)

५) प्रत्यक्षात काम सुरू झाल्यानंतर ७ दिवसांच्या कामांचे मोजमापानुसार मजुरी दराची नोंद घेऊन पूर्ण भरलेले ई-मस्टरची ग्राम रोजगार सेवकाच्या मदतीने आपले सरकार केंद्रातून डेटा एंट्री करेल (D.७.२-E-Muster Roll-Fill E-Muster Roll) व Wage list Generate(D.८ Wage List Generate wage list for payment) व मजुरी प्रदानाच्या पुढील कार्यवाहीकरीता AAO Login ला पाठवेल. (D.८ Wage List-Add payment details to wage list & send).

**ब) वरील काम केल्यानंतर आपले सरकार केंद्राच्या केंद्र चालकाला खालील प्रमाणे शर्ती व अटींच्या अधीन राहून सेवा शुल्काचा दर हा एका निर्गमित केलेल्या ई-मस्टरसाठी ५/- (पाच रूपये) प्रमाणे देय होईल.**

१) आपले सरकार केंद्र चालकाला ई-मस्टर ग्राम पंचायत स्तरावरून निर्गमित करण्यासाठीचे आवश्यक प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

२) ई-मस्टर निर्गमित करण्यासाठी आपले सरकार केंद्र चालकाने संगणक, इंटरनेट सुविधा, प्रिंटर व छपाई साठी लागणारे कागद उपलब्ध करून द्यावेत.

३) एका ई-मस्टर मध्ये जास्तीत जास्त १० मजूरांची नांवे समाविष्ट करण्यात यावीत. दहा मजुरांपेक्षा जास्त मजुर असल्यास त्या ई-मस्टरची विभागणी करण्यात यावी तसेच १० मजूरांपेक्षा कमी मजुर असल्यास एक मस्टर निर्गमित करण्यास हरकत नाही.

४) एकूण निर्गमित करण्यात आलेल्या ई-मस्टर मध्ये Zero Attendance Muster व Deleted Muster ची संख्या एकूण निर्गमित केलेल्या ई-मस्टर संख्येच्या १० टक्क्या पेक्षा जास्त नसावी. ही संख्या १० टक्क्या पेक्षा जास्त झाल्यास १० टक्क्यांच्या वरील Zero Attendance Muster व Deleted Muster चे सेवा शुल्क प्रती ई-मस्टर ५ रूपये प्रमाणे देय राहणार नाही.

५) आपले सरकार केंद्र चालकांना सेवा शुल्क एकत्रितरित्या एकूण ५०० रूपये पूर्ण झाल्यानंतर अदा करण्यात येईल.

६) सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये ज्या ग्राम पंचायतीत १०० ई-मस्टर्स निर्गमित होणार नाहीत त्या ठिकाणी सहा महिन्यानंतर निर्गमित झालेल्या ई-मस्टरच्या संख्येनुसार सेवा शुल्क अदा करण्यात येईल.

७) सेवा शुल्क हे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रशासकिय खर्चासाठी अनुज्ञेय असलेल्या ६ टक्के निधी मधून आपले सरकार केंद्र चालकाला पंचायत समिती मार्फत प्रदान करण्यात येईल.

८) आपले सरकार केंद्राच्या केंद्र चालकाने निर्गमित केलेल्या ई मस्टर्सच्या संख्येनुसार सेवा शुल्क मागणीचे पत्र ग्राम पंचायतीमार्फत गटविकास अधिकारी यांच्याकडे सादर करावे.

९) गटविकास अधिकारी यांनी प्राप्त मागणीनुसार संबंधित ग्राम पंचायतीमध्ये निर्गमित ई-मस्टर्सची संख्या MIS वर तपासून सेवा शुल्काचे देयक मागणी करणाऱ्या केंद्र चालकाला अदा करावे.

१०) आपले सरकार केंद्राच्या चालकाकडून सेवा शुल्क मागणीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसात गटविकास अधिकारी यांनी सेवा शुल्क प्रदान करणे आवश्यक राहील.

११) केंद्रचालकाकडून सेवाशुल्काबाबत काही तक्रार/ प्रश्न उपस्थित झाल्यास त्याबाबत केंद्र चालकाने दाद मागण्यासाठी जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार करावी व संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारीवर सुनावणी घेऊन तक्रारीचे निराकरण करून तक्रार निकाली काढण्यात यावी याबाबतचा निर्णय विभागीय आयुक्त, सचिव (ग्रामविकास) व सचिव (रोहयो) यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळवावा.

तसेच वरील कामावरील होणारा खर्च ज्या लेखाशिर्षातून करण्यात येतो, त्याच लेखाशिर्षाखाली वाढीव खर्च संबंधित लेखाशिर्षातून भागविण्यात येईल.

सदर शासन निर्णय ग्रामविकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२३१६१९०३९२१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Digitally signed by Eknath Rajaram Dawale
Date: 2018.04.24 15:29:27 +05'30'

**( एकनाथ डवले )**
**सचिव, रोजगार हमी योजना**

**प्रत** :-

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -३२
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२
४) सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
५) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
६) मा. मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई -३२
७) सर्व विभागीय आयुक्त
८) आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर
९) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई -३२ (प्रसिध्दिकरिता)
११) जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) सर्व
१२) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर
१३) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१४) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
१५) संचालक, फलोत्पादन, पुणे
१६) संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे
१७) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१८) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१९) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
२०) सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) सर्व
२१) सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय.
२२) सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२३) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२४) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर) विभाग पुणे
२५) कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)
२६) सारसंग्रह रोहयो - १ / निवडनस्ती (रोहयो-१)